ई. गोदातीर दि. 13.03.2025

# पोलीस पाटलांचा मेळावा व कार्यशाळा उत्साहात




नांदेड (प्रतिनिधी) – पोलीस प्रशासन आणि समाज यांचा एक घनिष्ट संबंध असतो. पोलिसांच्या कामकाज पध्दतीचा परिणाम समाजावर पडत असतो. पोलीस प्रशासन २४ तास समाजासाठी कार्यरत असतात. अशा वेळी दैनंदिन कामकाजाशिवाय सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवून विधायक कार्य करण्याकरीता पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली 'मिशन सहयोग' अंतर्गत पोलीस पाटील यांचा मेळावा आणि कार्यशाळा घेण्यात आली.

'मिशन सहयोग' अंतर्गत ऑपरेशन बीट कनेक्ट, मिशन उडान, ऑपरेशन वारसा जतन, नांदेड पोलीस लीग, मिशन महिला सुरक्षा, मिशन समाधान, मिशन निर्धार आणि मिशन एकता उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

त्यांचाच एक भाग म्हणून पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली ऑपरेशन बीट कनेक्ट अंतर्गत जिल्ह्यातील प्रत्येक गावाची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्यामध्ये संवाद वाढण्यासाठी दि. ११ मार्च रोजी सकाळी साडेआठ वाजता पोलीस मुख्यालय, कवायत मैदान येथे क्रिकेट व व्हॉलीबॉल, तसेच महिला पोलीस पाटील यांच्यासाठी संगीत खुर्ची सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यातील ३४ पोलीस पाटील यांना उत्कृष्ट कामगिरी करीता सत्कार करून सन्मानित करण्यात आले.

त्यानंतर पोलीस पाटील व ग्रामसुरक्षा दल यांच्याकरीता पोलीस पाटील मेळावा व नविन कायदे विषयक मार्गदर्शन कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव न्यायाधीश दलजीतकौर जज यांनी नविन कायदे विषयक तरतुदीची माहिती आणि पोलीस पाटील यांच्या कर्तव्याबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. खंडेराय धरणे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. अश्विनी जगताप, परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक किरण पोपळघट, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय, राखीव पोलीस निरीक्षक विजय धोंडगे यांच्यासह पोलीस अधिकारी, अंमलदार, कर्मचारी व जिल्ह्यातील जवळपास ५०० ते ६०० पोलीस पाटील व ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या पोलीस पाटलांचा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार आणि न्यायाधीश दलजीतकौर जज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.